

जा.क्र./नसका/स्थायी/सिआर-05/2022
दिनांकः- 01.06.2022

# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

स्थायी समितीच्या सभेची सूचना

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची ड चे प्रकरण-2 मधील नियम क्र. 3 (अ) अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूचि ड चे प्रकरण दोन मधील नियम क्र.3 (अ) (ब) अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा **दिनांक 03.06.2022 रोजी दुपारी 03.00 वाजता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभागृह येथे भरविण्यात येत आहे तरी या सभेस उपस्थित रहावे ही विनंती.**

करिता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारीत समयी उपस्थित राहून सहकार्य करावे.

(मा. सभापती स्थायी समिती यांच्या मान्यतेने)

(स. अजीतपालसिंघ संधु)
नगरसचिव,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

प्रति,
श्री / श्रीमती -------------------------------------------
सदस्य / सदस्या, स्थायी समिती,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

विषय क्रं. 01

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आस्थापनेवरील सफाई कामगार संवर्गातील कर्मचारी सेवेत असतांना मृत्यु पावल्यास सेवानिवृत्त/स्वेच्छा सेवानिवृत्त झाल्यास/वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरलेल्या सफाई कामगारांच्या पाल्यास/वारसास महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे परिपत्रक दि. 30.06.1994, 11.08.2006, महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभाग यांचे परिपत्रक दिनांक 21 ऑक्टोंबर 2011 व 11 मार्च 2016, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचे परिपत्रक दि. 26.08.2014, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे परिपत्रक क्रं. सफाई-2021/प्र.क्र.137/नवि-6 दिनांक 10.12.2021 च्या शासन परिपत्रकानुसार लाड समितीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने नेमणुक देणे संबंधीत तरतुद असुन महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार मे 21, 2011/वैशाख 31, शके 1933 अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 53 मधील सुधारणा अन्वये

नेमणुक देण्याचे अधिकार आयुक्त यांना प्रदान केले आहेत. कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-1/3755/2021 दिनांक 19.07.2021 अन्वये खालील सफाई कर्मचा-यांच्या पाल्यास/वारसास/नामनिर्देशित व्यक्तीस त्यांचे खालील नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे सफाई आस्थापनेवर सफाई कामगार या पवदावर आदेशातील नमुद अटीच्या अधिन राहुन निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात न्रियुक्ती देण्यात आली त्यास **कार्योत्तर मान्यतेस्तव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर.**

| अ. क्र. | कार्यालयीन आदेश क्रमांक | कर्मचा-यांचे नांव व पदनपाम | नियुक्ती देण्यात येणा-या वारसाचे नांव (कर्मचा-यांशी नाते) | प्रस्तावित पद | वेतनश्रेणी | नेमणूकीचा विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | नावाशमनपा/साप्रवि/आस्था-8/1602/22 दिनांक 09.05.2022 | श्रीमती रेशमाबाई बापुराव कांबळे, सफाई कामगार स्वेच्छा सेवानिवृत्त | श्रीमती रेखा विनायक कांबळे (सुन) | श्रीमती रेशमाबाई बापुराव कांबळे, सफाई कामगार यांच्या स्वेच्छा सेवानिवृत्तीमुळे रिक्त झालेल्या सफाई आस्थापनेवरील सफाई कामगार या पदावर | एस-1-15000-47600 (4440-7440 ग्रेड पे 1300) अधिक महागाई भत्ता ई. | स्वच्छता विभाग |
| 02 | नावाशमनपा/साप्रवि/आस्था-8/1608/22 दिनांक 09.05.2022 | श्री गौतम संभाजी गोडबोले सेवानिवृत्त पुरुष मजुर | श्री शुभम गौतम गोडबोले (मुलगा) | गौतम संभाजी गोडबोले, यांच्या सेवानिवृत्तीमुळे रिक्त झालेल्या सफाई आस्थापनेवरील सफाई कामगार या पदावर | एस-1-15000-47600 (4440-7440 ग्रेड पे 1300) अधिक महागाई भत्ता ई. | स्वच्छता विभाग |
| 03 | नावाशमनपा/साप्रवि/आस्था-3/2652/22 दिनांक 30.05.2022 | धरमविर रघुविर चिडालिया, मयत पुरुष सफाई कामगार | श्रीमती विजेता धरमविर चिडालिया (पत्नी) | धरमविर रघुविर चिडालिया यांच्या मृत्युमुळे रिक्त झालेल्या सफाई आस्थापनेवरील सफाई कामगार या पदावर | एस-1-15000-47600 (4440-7440 ग्रेड पे 1300) अधिक महागाई भत्ता ई. | स्वच्छता विभाग |

**विषय क्रं. 02**

**विषय :- कंत्राटी तत्वारवर इच्छुक सेवानिवृत्त अधिका-यांची चौकशी अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आली त्याची नोंद घेणे बाबत.**

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-1/2104/22दि. 18.05.22 अन्वये विष्यांकित प्रकरणी सर्व शिस्तभंगविषयक प्राधिका-यांनी राजपात्रिक अधिका-यांच्या विरुध्दची व अराजपत्रित कर्मचा-यांच्याविरुध्दची विभागीय चौकशीची प्रादेशिक विशेष अधिकारी, विभागीय चौकशी आणि जिल्हा चौकशी अधिकारी, विभागीय चौकशी यांच्याकडील अथवा त्यांच्या कक्षातील सर्व प्रकरणे दिनांक 01.07.2006 पासुन कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या सेवानिवृत्त अधिका-यांकडे सोपवुन निकाली काढावीत असे महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागा शासन निर्णय क्रं. एसपीओ/2804/प्र.क्र.11/04/11-अ दि. 26.05.06 च्या शासन निर्णयान्वये निर्देशित केले आहे. तसेच कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या चौकशी अधिका-यांकडे केवळ गट (क) व गट (ड) च्याच संवर्गातील कर्मचा-यांच्या विभागीय चौकशी देण्याबाबत महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रं. एसपीओ/2807/प्र.क्र.21/07/11-अ दि. 28.10.09 अन्वये निर्देशित केलेले आहे.

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागा शासन निर्णय क्रं. एसपीओ/2804/प्र.क्र.11/04/11-अ दिनांक 26.05.06 च्या शासन निर्णयामधील विवरणपत्र-अ मध्ये सेवानिवृत्त अधिका-यांना चौकशी अधिकारी म्हणन नियुक्त करण्यासाठीच्या अटी व शर्तीनुसार महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्रं. विभायो/प्र.क्र.39/11-अ दिनांक 23 जुलै 18 मध्ये शासनाने प्रसिध्द केलेल्या सेवानिवृत्त चौकशी अधिका-यांची सामाईक यादी (पॅनल) मधील अनु.क्रं. 41 वरील श्री र.स. भालेराव सेवानिवृत्त अधिदान व लेखा अधिकारी यांनी चौकशी अधिकारी म्हणुन काम करण्यासाठी श्री र.स. भालेराव सहाय्यक अभिदान व लेखा अधिकारी तथा कंत्राटी चौकशी अधिकारी औरंगाबाद यांचा अर्ज दिनांक 05.03.2022 अन्वये अर्ज देऊन सहमती दिली आहे.

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रं. संकीर्ण/1014/प्र.क्र.55/11-अ दिनांक 16.02.2015 च्या शासन निर्णयातील मुद्दा क्रं. 01 व 02 मध्ये एक अपचारी असलेल्या विभागीय चौकशी प्रकरणी कंत्राटी चौकशी अधिकारी यांना रुपये 12,000/- इतके मानधन देण्यात यावे. तसेच एका पेक्षा अधिक अपचारी असल्यास प्रत्येक अपचा-या मागे रु. 1500/- इतके वाढीव मानधन मुळ मानधनाच्या रक्कमेत (रु. 12000/-) वाढवुन देण्यात यावे. मात्र सदर मानधनाची कमाल मर्यादा रु. 24,000/- इतकी राहील असे नमुद आहे.

करिता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आस्थापनेवरील कर्मचा-यांच्या चौकशी प्रकरणी श्री र.स. भालेराव सेवानिवृत्त सहाय्यक अभिदान व लेखा अधिकारी तथा कंत्राटी चौकशी अधिकारी औरंगाबाद यांची नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत कंत्राटी चौकशी अधिकारी म्हणुन वरील शासन निर्णयातील तरतुदीनुसार नियुक्ती करण्यात येते. तसेच महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रं. संकीर्ण/1014/प्र.क्र.55/11-अ दिनांक 16.02.2015 च्या शासन निर्णयतील मुद्दा क्रं. 01 व 02 नुसार संबंधीतास प्रकरण परत्वे मानधन अदा करण्याची मान्यता सदरील आदेशाव्दारे देण्यात आली त्याची नोंद घेणे बाबत.

विषय क्रं. 03

**कार्यालयीन आदेश क्रं.नावाशमनपा/लेवि/339/22 दि.07.04.22 च्या आदेशाची नोंद घेणे बाबत.**

श्री विलास भोसीकर, अलेप मनपा नांदेड यांच्याकडे कार्यालयीन आदेश क्रं. मनपा/आयुक्तकक्ष/6557/2018 दिनांक 08.08.2018 अन्वये उपआयुक्त पदाच्या अतिरिक्त पदभार सोपविण्यात आलेला होता.

शासन निर्णय वित्त विभाग वेतन-1311/प्र.क्र.17/सेवा-3, दि. 28 ऑगस्ट 2013 व शासन निर्णय वित्त विभाग वेतन-1311/प्र.क्र.17/सेवा-3 दि. 01 जुन 2015 नुसार मनासे (वेतन) नियम 1981 च्या नियम 56 नुसार शासकीय कर्मचा-यांकडे स्वत:च्या पदाव्यतिरिक्त दुस-या पदाचा अतिरिक्त पदाच्या अतिरिक्त कार्यभार सोपविल्यास अशा दुस-या पदाकरिता यापुढे संबंधीत अधिकारी/कर्मचारी आहरीत असलेल्या वेतनाच्या (त्यांचे पे बँड मधील वेतन + ग्रेडपे) 5 टक्के एवढया दराने अतिरिक्त वेतन विशेष वेतन अनुज्ञेय राहील असे शासन निर्णय असल्याने संबंधीतास दिनांक 08.08.2018 ते 16.08.2020 या कालावधीचे अनुज्ञेय असलेले वेतन रुपये 85,485/- अदाई करण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थीक मान्यता प्रदान करण्यात येते. यावर लागणारा खर्च सालसन 2022-23 च्या संबंधीत शिर्षकातुन करण्यात यावा.

विषय क्रं. 04

कार्यालयीन आदेश क्रं.नावाशमनपा/लेवि/13380/22 दि.07.03.22 च्या आदेशाची नोंद घेणे बाबत.

श्रीमती शोभा वाघजी मुंडे, लेखाधिकारी, मनपा नांदेड यांच्याकडे कार्यालयीन आदेश क्रं. 8843/ दि. 14.12.20, क्रं. 9549 दि 31.12.20 व क्रं. 2741 दि. 25.06.21 अन्वये मुख्य लेखाधिकारी पदाच्या अतिरिक्त पदभार सोपविण्यात आलेला होता.

शासन निर्णय वित्त विभाग वेतन-1311/प्र.क्र.17/सेवा-3, दि. 28 ऑगस्ट 2013 व शासन निर्णय वित्त विभाग वेतन-1311/प्र.क्र.17/सेवा-3 दि. 01 जुन 2015 नुसार मनासे (वेतन) नियम 1981 च्या नियम 56 नुसार शासकीय कर्मचा-यांकडे स्वतःच्या पदाव्यतिरिक्त दुस-या पदाचा अतिरिक्त पदाच्या अतिरिक्त कार्यभार सोपविल्यास अशा दुस-या पदाकरिता यापुढे संबंधीत अधिकारी/कर्मचारी आहरीत असलेल्या वेतनाच्या (त्यांचे पे बँड मधील वेतन + ग्रेडपे) 5 टक्के एवढया दराने अतिरिक्त वेतन विशेष वेतन अनुज्ञेय राहील असे शासन निर्णय असल्याने संबंधीतास दिनांक 14.12.2020 ते 14.01.2022 या कालावधीचे अनुज्ञेय असलेले वेतन रुपये 23,021/- अदाई करण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थीक मान्यता प्रदान करण्यात येते. यावर लागणारा खर्च सालसन 2022-23 च्या संबंधीत शिर्षकातुन करण्यात यावा.

विषय क्रं. 05

श्रीमती शोभा वाघजी मुंडे, लेखाधिकारी (प्रतिनियुक्ती), यांचे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील कार्यरत कालावधीतील दि. 01.08.2021 ते 30.04.2022 पर्यंतचे सेवा निवृत्ती अंशदान रुपये 61,578/- व रजा वेतन अंशदान रुपये 76,815/- असे एकूण रुपये 1,38,393/- महालेखाकार नागपुर यांचेकडे भरणा करण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थीक मंजुरी कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/लेवि/1952/22 दिनांक 13.05.2022 अन्वये देण्यात आली त्यास **कार्योत्तर मान्यतेस्तव मनपा स्थायी समितीसभे समोर सादर.** यावर लागणारा खर्च सालसन 2022-23 च्या संबंधीत शिर्षकातुन करण्यात यावा.

विषय क्रं. 06

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिके मार्फत चालविण्यात येणा-या डॉ. राममनोहर लोहिया मुख्य वाचनालय, सर्व शाखा, सर्व स्पर्धा परिक्षा कैंद्र व सर्व कॉर्नर वाचनालयासाठी वृत्तपत्रे / साप्ताहीके / पाक्षिके / मासिके इत्यादींची पुढील आर्थिक तीन वर्षाकरिता खरेदी करण्यासाठी (दिनांक 01.05.2022 ते 31.03.2025) ई-निविदा सुचना (चौथ्यांदा) मागविण्यात आली असता फक्त एकच पुरवठाधारकांने निविदा या कार्यालयात सादर केलेली असुन सदरील निविदाधारक **ज्ञानगंगा वृत्तपत्र विक्रेता स्वयंसहाय्यता (पु) गचत गट नांदेड** यांची एक निविदा प्राप्त झाली असुन संबंधीतांनी वृत्तपत्रे 07% साप्ताहिके व पाक्षिके आणि मासिकांच्या छापील किमंतीवर 08% टक्के सुट देत असल्याचे कळविले असुन उपरोक्त तीन वर्षासाठी संबंधीतांची ई-निविदा सुचना मंजुर करुन वृत्तपत्रे / साप्ताहीके / पाक्षिके / मासिके इत्यादींची खरेदी करण्यासाठी लागणारा खर्च अंदाजे रुपये 45,00,000/- (अक्षरी रुपये पंचेचाळीस लक्ष फक्त) ची प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान करण्यासाठीचा प्रस्ताव मनपाच्या स्थायी समिती सभेसमोर सादर.

विषय क्रं. 07

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत अंतर्गत हैदरबाग यु.सी.एच.सी. येथे गरोदर महीलांचे तपासणी प्रमाणे जास्त असल्याने तसेच सदरील दवाखान्यातील स्त्री रोग तज्ञ, सर्जन व पॅरॉमेडीकल स्टाफ ही पदे **NUHM** मध्ये प्रस्तावित नाहीत तसेच मनपा आस्थापनेवर देखील मंजुर नाहीत. यासाठी

शासनाकडुन कोणत्याही प्रकारची निधी प्राप्त होत नाही. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका निधीतुन खालील पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने एकत्रित वेतनावर भरण्यासाठी वैद्यकीय अरोग्य अधिकारी, मनपा नांदेड यांनी अहवाल दिल्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 51 (3) नुसार स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | पदनाम | संख्या | मानधन / एकत्रीत वेतन |
|---|---|---|---|
| 01 | **X-Ray Technician** | 01 | 13,000/- |
| 02 | **EGC Technician** | 01 | 13,000/- |
| 03 | **Operation Theater Assistant** | 03 | 13,000/- |
| 04 | कनिष्ठ परिचर **(For Dental Surgeon Assistant)** | 01 | 10,000/- |
| 05 | **Sonography Assistant** | 01 | 10,000/- |

करिता उक्त पदे महानगरपालिका निधीतुन निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने एकत्रित वेतनावर भरण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 51 (3) नुसार स्थायी समितीची मान्यता घेणेसाठीचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**विषय क्रं. 08**

**विषय :- मुलभुत सोयी सुविधा योजने अंतगर्कत नावाशमनपा हद्यीतील प्रभाग क्रं. 19-ब मध्ये उस्माननगर रोड ते महमद किराणा पर्यंत सी.सी. रस्ता करणे.**

**संदर्भ :-** 1) प्र. मान्यता प्राप्त जा.क्रं. 2021/नपाप्र/टे-6/मु.सो.सु./मनपा/सिआर-76 दिनांक 23.12.2021

2) कार्यारंभ आदेश क्रं. नावाशमनपा/साबांवि/12958/2022 दि. 28.02.2022

3) स.स. सौ. दिपाली संतोष मोरे यांचे पत्र दिनांक 24.03.2022

मुलभुत सोयी सुविधा योजने अंतर्गत नावाशमनपा हद्यीतील प्र.क्रं. 19-ब मध्ये उस्माननगर रोड ते महमंद किराणारा पर्यंत सी.सी. रता करणेसाठी संदर्भ क्रं. 1 च्या प्रशासकीय मंजुरी मिळाल्यानुसार इ-निविदा प्रक्रीया हाती घेण्यात येवून संदर्भ क्रं. 02 अन्वये एस. एस. कन्सट्रक्शन नांदेड यांची निविदा किमंत (रुपये 20,00,000/-) अंदाजपत्रकीय दर + GST निविदा मंजुर करुन कार्यारंभ आदेश देण्यात आले आहे.

तसेच सदर ठिकाणी उस्माननगर येथे 177.00 मी. लांबी व 4.00 मी राफंदी मध्ये काम करत असतांना संदर्भ क्रं. 03 अन्वये स. स. सौ. दिपाली संतोष मोरे यांचे पत्रानुसार व नागरीकांच्या विनंतीनुसार सदर काम एकूण 247 मी. X 4.00 मी. मध्ये पुर्ण करुन देण्याची विनंती केली आहे कनिष्ठ अभियंता व उपअभियंता यांच्या अहवालानुसार सदर काम करणे आवश्यक असुन सदरील वाढीव कामाची अदाजीत किमंत रुपये 8,37,590/- असे एकूण रुपये 28,37,590/- एवढी रक्कम येत आहे.

करिता मुलभुत सोयी सुविधा योजने अंतर्गत सदर कामाची मंजुर किमंत रुपये 20,00,000/- (शासन निधी) + वाढीव किमंत रुपये 8,37,590/- यास मनपा सालसन 2022-23 च्या अंदाजपत्रकातील संबंधीत लेखाशिर्षकातुन करण्याची सुधारीत प्रशासकीय व आर्थीक मान्यता प्रदान करुन वाढीव काम रुपये 8,37,590/- यास मुळ मंजुर कंत्राटदाराकडून व मंजुर दरावर हाती घेण्याच्या मान्यतेकरीता प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर.

विषय क्रं. 09

विषय :-मुलभुत सोयी सुविधा योजने अंतर्गत एकूण तरतुद रु. 50.00 कोटी मधील कामे जा.क्रं. इ-निविदा/साबांवि/नावाशमनपा/12454/2022 दिनांक 16.02.2022 प्रभाग क्रं. 13 व 15 कामाची निविदा किमंत रुपये 1,77,78,684/- शासन पत्रातील अ.क्रं. 1,2,3,4,5,6,7,8,9,10 ते 20 व 41,42

संदर्भ :-1) प्रशासकीय मान्यता आदेश क्रं. 2021/नपाप्र/टे-6/मु.सो.सु/मनपा/सिआर-92 दिनांक 16.02.2022

2) जा.क्रं.नावाशमनपा/साबांवि/1040/2022 दिनांक 25.04.2022

3) अब्दुल मुखीम अब्दुल हकीम, नांदेड यांचे पत्र दिनांक 18.05.2022

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील मुलभत सोयी सुविधा योजने अंतर्गत एकूण तरतुद रु. 50.00 कोटीमधील कामे करणेसाठी संदर्भीय आदेशान्वये मान्यता दिल्यानुसार निविदा किमंत रु. 1,77,78,684/- जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/12454/2022 दिनांक 16.02.2022 अन्वये वर्तमानपत्रातुन दि. 18.02.22 रोजी इ-निविदा मागविली असता नियोजीत वेळेत एकूण 02 (दोन) निविदा पात्र झाल्या. पात्र निविदा त्रिसदस्यीय समिती समोर उघडण्यात आले असता त्यांचा आर्थीक तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेले दर |
|---|---|---|
| 01 | अब्दुल मुकीम अब्दुल हकीम नांदेड | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.50% जास्त दराची |
| 02 | ए.जी. कंन्सट्रक्शन नांदेड | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 8.97% जास्त दराची |

वरील तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निवदा कंत्राटदार **अब्दुल मुकीम अब्दुल हकीम नांदेड** यांची असुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.50% जास्त दराची आहे. सदरचे दरा जास्त वाटत असल्यामुळे संदर्भ क्रं. 02 अन्वये संबंधीतास वाटाघाटीसाठी पाचारण केले असता संबंधीतांनी प्रत्यक्ष कार्यालयात उपस्थित राहुन लेखीपत्र देवुन सिमेंट, डांबर व गजाळी गिट्टी इत्यादीच्या दरात वाढ झाल्यामुळे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.50% ऐवजी 2% जास्त दराने काम करण्यास तयार असल्याचे लेखी समंती दिली आहे.

वरील प्रमाणे निविदाधारकांनी कळविल्यानुसार दर पृथ्थकरण करण्यात आले. सिमेंट, गजाळी डांबर यांचे भाववाढ झाल्यामुळे दरा पृथ्थकरणानुसार सदरचे दर हे 4.02% जास्तीचे येत आहे. त्यानंतर निविदाधारकांने उपस्थित राहुन सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2% जास्त दराने काम करण्यास तयार असल्याचे लेखी समंती दिली आहे. सदरील दर हे साहीत्याच्या प्रचलित दरानुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराचे आहेत.

करीता सदर कामासाठी **अब्दुल मुकीम अब्दुल हकीम नांदेड** यांनी लेखीपत्र दिल्यानुसार वाटाघाटीअंती सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2% जास्त दर + GST या दराने मंजुर प्रशासकीय रक्कमेच्या मर्यादत कामाची संविदा करणेकामी प्रस्ताव मनपा स्थायी समितीच्या पटलवर ठेवण्यात येते.

विषय क्रं. 10

विषय :-मुलभुत सोयी सुविधा योजने अंतर्गत एकूण तरतुद रु. 100.00 कोटी मधील कामे

जा.क्रं. इ-निविदा/साबांवि/नावाशमनपा/12453/2022 दिनांक 16.02.2022

कामाची निविदा किमंत – 5,87,48,479/-

शासन पत्रातील अ.क्रं. 13/10, 13,25, 15/7, 15/26

संदर्भ :-1) प्रशासकीय मान्यता आदेश क्रं. 2021/नपाप्र/टे-6/मु.सो.सु/मनपा/सिआर-93 दिनांक 16.02.2022 (रु. 6.70 कोटी)

2) जा.क्रं.नावाशमनपा/साबांवि/1195/2022 दिनांक 28.04.2022

3) मे. अबचलनगर इन्फ्रास्ट्रक्चर, नांदेड यांचे पत्र दिनांक 18.05.2022

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील मुलभत सोयी सुविधा योजने अंतर्गत एकूण तरतुद रु. 100.00 कोटीमधील कामे करणेसाठी संदर्भीय आदेशान्वये मान्यता दिल्यानुसार निविदा किमंत रु. 5,87,48,479/- जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/12453/2022 दिनांक 16.02.2022 अन्वये वर्तमानपत्रातुन दि. 18.02.22 रोजी इ-निविदा मागविली असता नियोजीत वेळेत एकूण 03 (तीन) निविदा पात्र झाल्या. पात्र निविदा त्रिसदस्यीय समिती समोर उघडण्यात आले असता त्यांचा आर्थीक तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेले दर |
|---|---|---|
| 01 | गुरुरामदास कन्सट्रक्शन नांदेड | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 8.00% जास्त दराची |
| 02 | अबचलनगर इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 6.00% जास्त दराची |
| 03 | जागीड बदर्स अन्ड डेव्ह. इंजि.नांदेड | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10.00% जास्त दराची |

वरील तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निवदा कंत्राटदार **अबचलनगर इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड** यांची असुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा 6.00% जास्त दराची आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्यामुळे संदर्भ क्रं. 02 अन्वये संबंधीतास वाटाघाटीसाठी पाचारण केले असता संबंधीतांनी प्रत्यक्ष कार्यालयात उपस्थित राहुन लेखीपत्र देवुन सिमेंट, डांबर व गिट्टी इत्यादीच्या दरात वाढ झाल्यामुळे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 6.00% ऐवजी 4.89% जास्त दराने काम करण्यास तयार असल्याचे लेखी समंती दिली आहे.

वरील प्रमाणे निविदाधारकांनी कळविल्यानुसार दर पृथ्थकरण करण्यात आले. सिमेंट, गजाळी डांबर यांचे भाववाढ झाल्यामुळे दरा पृथ्थकरणानुसार सदरचे दर हे 5.11% जास्तीचे येत आहे. त्यानंतर निविदाधारकांने उपस्थित राहुन सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.89% जास्त दराने काम करण्यास तयार असल्याचे लेखी समंती दिली आहे. सदरील दर हे साहीत्याच्या प्रचलित दरानुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराचे आहेत.

करीता सदर कामासाठी **अबचलनगर इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड** यांनी लेखीपत्र दिल्यानुसार वाटाघाटीअंती सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.89% जास्त दर + GST या दराने मंजुर प्रशासकीय रक्कमेच्या मर्यादत कामाची संविदा करणेकामी प्रस्ताव मनपा स्थायी समितीच्या पटलवर ठेवण्यात येते.

विषय क्रं. 11

विषय :- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सॉफ्टवेअर नुतनीकरण करुन देखभाल दुरुस्तीच्या कामास मंजुरी प्रदान करणे बाबत

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिके अंतर्गत चालू असलेल्या सॉफ्टवेअर संबंधात प्रशासन अधिक गतिमान करण्याच्या दृष्टीने माहिती तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर व्हावा व त्यासाठी संगणकीकरणाला चालना मिळावी या साठी शासनाच्या सर्व विभागात ई-गव्हर्नस प्रकल्प राबविण्यात येत आहेत. ज्यामुळे सर्व कामकाज पारदर्शी पध्दतीने व विहित कालावधीत पार पाडल्या जाईल. जेणे करुन नागरीकांचा वेळ वाया न जाता त्यांच्या तक्रारीचे विहित मुदतीत निरसन करणे सुलभ होईल. तसेच ई-गव्हर्नन्सचे महत्व लक्षात घेवून शासकिय कामात पारदर्शकता व कार्यक्षमता आणनेसाठी व वेगाने काम करण्यासाठी तसेच शहरातील नागरीकांना शासकिय सेवा ऑनलाईन उपलब्ध व्हावी यासाठी सदर प्रकल्प राविणे हितकारक असल्यामुळे, सदर ई-गव्हर्नस कार्यक्रमांतर्गत नांदेड वाघाळा शहर महापालिके मध्ये सालसन 2012 साली Uddan/Imega प्रकल्प कार्यान्वयीत करण्यांत आला. सदर प्रकल्पाचे काम मे. वायम टेक्नॉलॉजी, नवि दिल्ली यांना देण्यांत आले होते. मे. वायम टेक्नॉलॉजी, नवि दिल्ली यांच्या अंतर्गत दोन उपकंपन्या ERDS व Elbiz कार्यरत होत्या.

मे. वायम टेक्नॉलॉजी नवि दिल्ली यांनी Double Entry Accounting, Water Tax Management System, Citizen Grievance, Inward / Out Ward, Budjet Control Management, Establishment, Solid West Management System, Health Facility Management, Asset Management, Public Work Management, Garden, Library Management, Legal Management, Citizen Facility Centers, Project Management System, Email, इत्यादी मॉड्युल्स तयार करुन, डेव्हलप करुन, कार्यान्वयीत केलेले असून कार्यालयीन कामकाज करण्यांत येत आहे.

तथापी उक्त उपकंपन्यांना विहित कालावधीत त्यांचे पेमेन्ट मिळत नसल्यामुळे त्यांनी प्रत्येकाचे पेमेन्ट वेगवेगळे करण्याची विनती केल्यानुसार तत्कालीन मा. आयुक्तांनी दिनांक 31.01.2014 रोजी मान्यता प्रदान केली. सदर मान्यतेनुसार ERDS व Elbiz यांना रक्कम अदा करण्यांत आली.

सालसन 2016 मध्ये महापालिकेने स्वत:चे डेटा सेन्टर स्थापन करुन त्या मधून सर्व सेवा कार्यान्वयीत करण्यांत आलेल्या असून, त्यांचे एक डेटा सेंन्टर बॅकअप साठी कार्यान्वयीत केलेले आहे. सदर मुदत जानेवारी 2021 मध्ये संपनेली होती तथापी कोरोना कार्यकाळात नविन टेंन्डर काढणे शक्य नसल्यामुळे सदर कंपनीस जून 2021 पर्यन्त मुदतवाढ देण्यांत आली होती. सदरच्या मुदतवाढ कालावधीत कोरोनाच्या दुसऱ्या लाटेमुळे पाणी कराचे व घरपट्टीचे मागणी बिले तयार होणेस विलंब झाल्यामुळे अद्याप पर्यन्त Elbiz System Indore (MP) यांचे कडूनच काम करुन घेण्यांत येत आहे.

सध्या कोरोनाची लाट कांही प्रमाणात कमी झाल्यामुळे डेटा सेंन्टर व सॉफ्टवेअर अपग्रेड करणेच्या कामी तीन वर्षासाठी नवीन एजन्सी नेमणे आवश्यक असल्यामुळे उक्त सर्व काम करणेसाठी टेन्डर डाक्युमेंन्ट तयार करणे, निविदा सुचना प्रारुप तयार करणे इत्यादी कामासाठी M/s Erudite Consultancy Services, Pune यांची सल्लागार (PMC) म्हणून नियुक्ती कार्यालयीन कार्यारंभ आदेश क्र. मनपा/संकक्ष/6890/2019 दिनांक 18.09.2019 अन्वये करण्यांत आली असुन संबंधीतांकडून दिनांक 27.09.2019 रोजी सदरील कामासाठी करारनामा करुन घेण्यांत आलेला आहे. त्या अनुषंगाने सदरील कामाचे सल्लागार (PMC) यांनी सदरील कामासाठी निविदा तयार करुन देवून उक्त निविदा क्र. मनपा/संगणककक्ष/10417/2022 दिनांक 04.01.2022 अन्वये दिनांक 05.01.2022 रोजी महापालिका संकेत स्थळावर प्रसिध्दीस देवून दिनांक 10.02.2022 सायं. 6.00 पर्यन्त मुदत देवून निविदा मागविण्यांत आल्या परंतु सदरील कालावधीत निविदा प्राप्त न झाल्यामुळे पुनश्च दिनांक 21.03.2022

पर्यन्त मुदतवाढ देण्यांत आली सदरील कालावधीत चार निविदा सुचना प्राप्त झाल्या त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

Received Tenders From:

| Bidder Name | Bid Number | Tender Technical Analysis Status | Bid Amount ( in Rs.) | Bid Rank |
|---|---|---|---|---|
| SPARROW SOFTECH PRIVATE LIMITED | 4082608 | Accepted | 1795000.00 | L1 |
| NYATI TECHNOLOGIES PVT LTD | 4140528 | Accepted | 3983000.00 | L2 |
| XTENSIBLE SOFTWARE TECHNOLOGIES PVT. LTD. | 4139333 | Accepted | 4848000.00 | L3 |
| New Indictrans Technologies Pvt Ltd | 4063612 | Accepted | 7350000.00 | L4 |

सदरील प्राप्त झालेल्या निविदा त्रिसदस्यीय समिती समोर उघडण्यांत आल्या असता सर्वात कमी दराची निविदा M/s. SPARROW SOFTECH PRIVATE LIMITED, Ranchi यांची असून या संदर्भात मा. आयुक्त, म. न. पा. यांचे कक्षात दिनांक 25.04.2022 रोजी बैठक घेण्यांत आली सदरील बैठकीस मा. अतिरिक्त आयुक्त, म.न.पा. नांदेड उपआयुक्त, म. न. पा. नांदेड, सिस्टीम मॅनेजर, सदरील कामाचे सल्लागार (PMC) व संबंधित निविदाधारक हे उपस्थित होते. सदरील बैठकीत मा. आयुक्त यांनी महापालिकेतील सॉफ्टवेअरच्या नुतनीकरणास मान्यता दिल्यानुसार उक्त कामासाठी व सल्लागार यांची फिस याचा सविस्तर तपशील खालील प्रमाणे सादर करण्यांत येत आहे.

Our e-Governance application current maintenance contract with the Current Vendor was ended on 31st march 2022 and Given extension till 30th Apr 2022. For application maintenance and Up-gradation as per requirement, we appointed M/s Erudite consultancy services as Project management Consultant to gather our requirements, prepare tender document on that basis, tender process, vendor selection and project management.

As per our requirement PMC prepared tender document and processed as below

Reference:

1) Tender Ref No NWCMC/COMP.Sec/10417/2022 dated 04/01/2022
2) Technical bid opening on 22/03/2022 and technical evaluation report submitted on 07/04/2022
3) Commercial bid opening on 08/04/2022.

| Sr. No. | Description of work | Qty | UoM | Quoted Unit Rate | Qty | Total Amount | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|
| a | System Integraion ( existing database to new database as per requirement with out data loss) one time | 1 | lumpsum | 7,15,000.00 | 1 | 7,15,000.00 | One time charges to be paid after complete handover of existing system from previous vendor and database integration upto date ( current date) |
| b | implementation and development of e-gov existing module as per scope in the tender document sec 7 | 1 | per month | 3,75,000.00 | 36 | 1,35,00,000.00 | Monthly charges for maintenance and ongoing development of upgradation of the system |
| c | resident and remote engineer support for application | 1 | per month | 1,25,000.00 | 36 | 45,00,000.00 | Monthly manpower charges |
| d | cloud server support | 1 | per month | 1,25,000.00 | 60 | 75,00,000.00 | Monthly cloud server charges |
| e | sms gateway server ( 15,00,000 per year) | 1 | per year | 2,80,000.00 | 5 | 14,00,000.00 | Monthly SMS gateway charges |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| f | post 3 years maintenance service along with 10% upgrade in services cost per month with manpower (b+c+10%) | 1 | per month | 1,75,000.00 | 24 | 42,00,000.00 | Monthly charges for amd after 3 years. of amc is over with 10% upgrade in the price including manpower cost |
| | | | | | TOTAL PROJECT COST( 5 Years) | | 3,18,15,000.00 |

Project cost bifurcation in terms of per year expense as below:

| Sr. No. | Description of work | Qty | UoM | Quoted Unit Rate | Qty | Total Amount |
|---|---|---|---|---|---|---|
| | One time Expense to NWCMC | | | | | |
| a | System Integraion ( existing database to new database as per requirement with out data loss) onetime | 1 | lumpsum | 7,15,000.00 | 1 | **7,15,000.00** |
| | Yearly Expense to NWCMC for 3 years | | | | | |
| b | implementation and development of e-gov existing module as per scope in the tender document sec 7 | 1 | per month | 3,75,000.00 | 12 | 45,00,000.00 |
| c | resident and remote engineer support for application | 1 | per month | 1,25,000.00 | 12 | 15,00,000.00 |
| d | cloud server support | 1 | per month | 1,25,000.00 | 12 | 15,00,000.00 |
| e | sms gateway server ( 15,00,000 peryear) | 1 | per year | 2,80,000.00 | 1 | 2,80,000.00 |
| | Per Year Expense for 3 1st , 2nd and 3rd Year | | | | | 77,80,000.00 |
| | After 3 Year per Year Service Expense 2 Years | | | | | |
| d | cloud server support | 1 | per month | 1,25,000.00 | 12 | 15,00,000.00 |
| e | sms gateway server ( 15,00,000 peryear) | 1 | per year | 2,80,000.00 | 1 | 2,80,000.00 |
| f | post 3 years maintenance service along with 10% upgrade in servicescost per month with manpower (b+c+10%) | 1 | per month | 1,75,000.00 | 12 | 21,00,000.00 |
| | Per Year Expense for 4th and 5th Year | | | | | 38,80,000.00 |

| Sr No. | Year | BOQ LINE ITEM | EXPENSES (Per Year |
|---|---|---|---|
| A | 1st Year | BOQ (a+b+c+d+e) | 84,95,000.00 |
| B | 2nd Year | BOQ (b+c+d+e) | 77,80,000.00 |
| C | 3rd Year | BOQ (b+c+d+e) | 77,80,000.00 |
| D | 4th Year | BOQ (d+e+f) | 38,80,000.00 |
| E | 5th Year | BOQ (d+e+f) | 38,80,000.00 |
| GRAND TOTAL(INCL ALL TAXES) | | | 3,18,15,000.00 |

सल्लागार (PMC) यांची पांच वर्षाची फिस चा तपशील.

| Sr. No. | PMC Work Details | Project Cost | Fees (Percentage of project cost) | Duration | Fees in Rupees |
|---|---|---|---|---|---|
| 1 | DPR, Tender document preparation, Bidder document technical analysis, Bidders Commercial analysis, Vendor selection | 3,18,15,000.00 | 2% | One Time | 6,36,300.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | Vendor monthly Progress Check, Report submit to NWCMC for Vendor Billing process | 3,18,15,000.00 | 1% | 1st Year | 3,18,150.00 |
| 3 | Vendor monthly Progress Check, Report submit to NWCMC for Vendor Billing process | 3,18,15,000.00 | 1% | 2nd Year | 3,18,150.00 |
| 4 | Vendor monthly Progress Check, Report submit to NWCMC for Vendor Billing process | 3,18,15,000.00 | 1% | 3rd Year | 3,18,150.00 |
| 5 | Vendor monthly Progress Check, Report submit to NWCMC for Vendor Billing process | 3,18,15,000.00 | 1% | 4th Year | 3,18,150.00 |
| 6 | Vendor monthly Progress Check, Report submit to NWCMC for Vendor Billing process | 3,18,15,000.00 | 1% | 5th Year | 3,18,150.00 |
| | | | | **TOTAL PMC FEES (5 Years)** | **22,27,050.00** |

सदरील सॉफ्टवेअर नुतनी करणासाठी वरील प्रमाणे पांच वर्षासाठी लागणारा अंदाजे खर्च रु. 3,18,15,000.00 तसेच सदरील कामासाठी नियुक्त करण्यांत आलेले सल्लागार (PMC) यांची वरील तक्त्यानुसार पांच वर्षाची फिस रु. 22,27,050/- असे एकुण रु. 3,40,42,050/- एवढा खर्च अपेक्षित आहे व त्यास स्थायी समितीची मान्यता आवश्यक असल्यामुळे उक्त सल्लागार (PMC) नियुक्तीस, मागविण्यांत आलेल्या निविदा पैकी कमी दराचे निविदाधारक **M/s SPARROW SOFTECH PRIVATE LIMITED, Ranchi** यांची निविदा मंजूर करणे व या कामास लागणार्‍या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यासाठी प्रशासकिय प्रस्ताव स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर.

**विषय क्रं. 12**

**विषय :-** सौ. अलका राजु गुल्हाने यांना देण्यात आलेले भुसंपादन पोटी देण्यात आलेली अग्रीम रक्कम रुपये 20 लक्ष परत घेण्यासाठी कायदेशीर कार्यवाही करणे बाबत.

मनपा तर्फे सर्वे नं. 58-अ वजिराबादयेथील 60 आर. जागा महानगरपालिकेने खरेदी करुन मलशुध्दीकरण केंद्राचे बांधकाम सन 2010 मध्ये केली आहे. परंतु सौ. अल्का राजु गल्हाने यांनी वजिराबाद सर्वे नं. 56 येथील जागेत ट्रीटमेंट प्लान्ट करीता अनाधिकृत जागेचा ताबा घेऊन बांधकाम केल्या बाबतची तक्रार त्यांनी वारंवार केली आहे.

सौ. अल्का राजु गुल्हाने यांनी दिनांक 24.04.1989 च्या रजिस्टर्ड खरेदीखता आधारे जिवनाजी नारायण हळदे यांचेकडून सर्वे नं. 56-ब मधील 40 आर. जमीन खरेदी केली त्यामध्ये चुकीची चतु:सिमा दर्शविण्यात आली आहे. सदरील खरेदीखता मध्ये पुर्वेस: देशमुख यांनी खरेदी केलेला हिस्सा, पश्चिमेस: सर्वे नंबर 58 दक्षिणेस: रेल्वे लाईन आणि उत्तरेस: काशिनाथ नारायण यांचे शेत दर्शविण्यात आले. वास्तविक सर्वे नंबर 56/A काशिनाथ नारायणचा हिस्सा जिवणाजी नारायणच्या सर्वे नंबर 56/**B** च्या दक्षिणेस असतांना तो उत्तरेस दाखविला ती चुक त्यांनी केली असल्यामुळे काशिनाथ नारायण किंवा त्यांनी ज्यांना त्यांची जमीन विक्री केली त्यांची नाही तर ती चुक सौ. अल्का गुल्हाने किंवा जिवणाजी नारायण यांची आहे. सदरील 40 आर. जमीन खरेदी करण्यापुर्वी घेतलेल्या जमीनीची तालुका निरीक्षक भुमी अभिलेख किंवा उपअधिक्षक भुमी अभिलेख यांचेकडुन मोजणी करुन घेतलेली नाही. तसेच नगर भुमापन क्रमांकाचा सुध्दा त्यात उल्लेख करण्यात आलेला नाही. म्हणून दिनांक 24.04.1989 रोजी सौ. अल्का गुल्हाने यांनी जे खरेदीखत करुन घेतले, ते चुकीचे असुन त्यास महागनरपालिकेचा अर्थाअर्थी संबंध नाही.

काशिनाथ नारायण यांचेकडुन सौ. स्नेहल विजय निलावार यांनी 58/**A** मधील 60 आर. जमीन दिनांक 17.08.2007 रोजी रजिस्टर्ड विक्रीखता आधारे खरेदी केलेली जमीन उत्तर नोंदडसाठी S.P.S. (Sewerage Pumping Station) बांधण्यासाठी महानगरपालिकेने सौ. स्नेहल विजय निलावार यांचेकडून खरेदी खतान्वये तालुका निरिक्षक भुमी अभिलेख यांच्यातर्फे सदरील 60 आर. जमीनीची मोजणी दिनांक 26.11.2007 रोजी करण्यात आली. त्याचा नकाशा संचिकेत उपलब्ध आहे. परंतु दिनांक 31.03.2018 रोजी रक्कम रुपये 4,40,000/- रुपये ठरले प्रमाणे खरेदी खत केला आहे.

सौ. स्नेहल विजय निलावार यांनी 30.03.2008 रोजी सदरील 60 आर. जमीनीचे खरेदीखत महानगरपालिकेच्या हक्कात करुन देऊन ताबा दिला. सदरील जागेवर S.P.S. चा मोठा खर्च करुन प्लॉट बांधण्यात आला व तो सध्या उपयोगात आहे.

सौ. अल्का गुल्हाने त्यांनी खरेदी केलेल्या जागेत त्यांचा कधीच ताबा नव्हता म्हणुन त्यांनी दिनांक 17.08.2011 रोजी जागेची मोजणी उपअधिक्षक भुमी अभिलेख यांचे मार्फत केली. त्या मोजणी प्रमाणे महानगरपालिकेच्या S.P.S. प्लांट पुर्ण 60 आर. भाग सर्वे नंबर 56 नगर भुमापन क्रं. 3724 वर आहे असे दर्शविले. महानगरपालिकेच्या अर्जानुसार सदरील जागेची मोजणी दिनांक 09.07.2012 रोजी केली. त्यामध्ये S.P.S. चा 14 आर. भाग नगर भुमापन क्रमांक 3724 व 46 आर. भार सर्वे नंबर 57 वर दर्शविला. त्यानंतर दिनांक 07.01.2019 रोजी S.P.S. ची मोजणी केली. त्या प्रमाणे S.P.S.चा 29 आर भाग सर्वे नंबर 56 वर दर्शविला. अशा प्रकारे भुमी अभिलेख विभागा तर्फे वेगवेगळया तारखेस S.P.S. च्या जागेची मोजणी केली असता त्यानी वेगवेगहया जागेवर S.P.S. आहे असे दर्शविले असुन प्रत्यक्षात बांधकामाचे ठिकाण निश्चित केलेले नाही.

सौ. अल्का गुल्हाने रिट याचिका 7881/2016 मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केली होती. त्या मध्ये मा. उच्च न्यायालयाने सौ. गुल्हाने यांना कायदेशीर तरतुदीचा अवलंब करण्याचे निर्देश देऊन प्रकरण निकाली काढले. सौ. अल्का गुन्हाने यांनी कायदेशीर मार्गाचा अवलंब न करता किंवा त्यांनी जिवनाची हाळदे यांचे कडुन जमीन खरेदी केलेली होती त्यांच्या किंवा त्यांच्या वारसा विरुध्द न्यायालयात जाऊन दाद न मागता महानगरपालिका नांदेड विरुध्द वेगवेगळे निवेदन उपोषन करुन माझ्याच जागेवर S.P.S. बांधलेले आहे त्यांचा मावेजा मला देण्यात यावा असा पवित्रा घेत असुन प्रशासनास अडचणीत आणीत आहेत.

दिनांक 22.01.2020 रोजी मंत्रालयात मा. मुख्यमंत्री यांना निवेदन देऊन मी दिनांक 26.01.2020 रोजी मंत्रालया पुढे आत्मदहन अथवा नग्न अवस्थेत आमरण उपोषण करणार असे त्या निवेदनात म्हटले मा. सचिवच मुख्यमंत्री कार्यालय यांनी त्या प्रकरणात दिनांक 27.01.2020 रोजी संचिकेसह उपस्थित राहण्यास सांगितले. तदनंतर सदरील जमीन संपादीत करावी व त्यांची प्रक्रिया पुर्ण होई पर्यंत अग्रीम रुपये 25,00,000/- सौ. अल्का गुल्हाने यांना देण्यात यावेत असा निर्णय तत्कालीन आयुक्त महोदयांनी घेतला. व त्यानुसार आता पर्यंत रुपये 20,00,000/- (लक्ष) त्यांना देण्यात आले आहेत. या प्रकरणात मुळ जागेचे मालक कलवतीबाई काशिनाथ हळदे व इतर यांनी दिवाणी दावा क्रं. 24/2020 मा. दिवाणी न्यायालय वरिष्ठस्तर नांदेड येथे जागा मालकी बाबत दाखल केले असुन मनपासह सौ. स्नेहल निलावार, सौ. अल्का गुल्हाने व इतर यांना प्रतिवादी केले असून सौ. अल्का गुल्हाने यांनी त्यांचे जागेबाबत चुकीची जमीन मोजणी केल्याने सदर मोजणी रद्द करावी या बाबत दावा दाखल केला आहे त्यामुळे देण्यात आलेली रक्कम ही परत घेणे आवश्यक असल्यामुळे त्यांना नोटीस देणे, न्यायालयात दावा दाखल करणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 481 नुसार प्रस्ताव स्थायी समिती सभेसमोर सादर करण्यात येत आहे.

(स. अजीतपालसिंघ संधु)
नगरसचिव,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड